# महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद, सांगली

ई-निविदा नोटीस क्र.जिपसां/मबाक/लेखा/ई-निविदा/९२५/२०२४/

दिनांक: १० / ७ /२०२४

सन 2024--25 या वित्तीय वर्षात **(सन 2023-24 मध्ये मंजूर असलेल्या निधीतून)** अनुसूचित जाती उपयोजना (विघयो) अंतर्गत सांगली जिल्ह्यातील ग्रामीण भागातील अंगणवाडी केंद्रामधील कुपोषित मुलामुलींसाठी तसेच गरोदर महिला व स्तनदा मातांसाठी अतिरिक्त आहार (मल्टी मिलेट पौष्टीक बिस्कीट) पुरविणे

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली हे वरील प्रमाणे नमूद साहित्य खरेदी करिता ऑनलाईन निविदेद्वारे (दोन लिफाफा) पद्धतीने ई-निविदा मागवीत आहेत.

| अ.क्र | योजनेचे नांव व निधीचा तपशील | पात्रता | खरेदीची अंदाजित रक्कम | बयाणा रक्कम | अनामत रक्कम ३% | निविदा विक्री किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | |
| १ | अनुसूचित जाती उपयोजना (विघयो) अंतर्गत सन 2024-25 या वित्तीय वर्षात (सन 2023-24 मध्ये मंजूर असलेल्या निधीतून) सांगली जिल्ह्यातील ग्रामीण भागातील अंगणवाडी केंद्रामधील कुपोषित मुला मुलींसाठी तसेच गरोदर महिला व स्तनदा मातांसाठी अतिरिक्त आहार (मल्टी मिलेट पौष्टीक बिस्कीट) पुरविणे | उत्पादक,अधिकृत विक्रेता, वितरक | १,००,००,०००/- (एक कोटी रुपये मात्र) | 100000/- | देयकातून कपात केली जाईल | 18000/- |

**ई- निविदा खालील वेळापत्रकाप्रमाणे राबविणेत येणार आहे.**

| अ.नं. | कार्यवाहीचा टप्पा | कार्यवाही बाबतची तारीख | वेळ |
|---|---|---|---|
| 1 | ई- निविदा प्रसिध्द करणे / डाउनलोड करणे | दि. 10 / 07 /2024 | 17:00 PM |
| 2 | ई- निविदा नमुना साहित्य जमा करावयाची अंतिम तारीख | दि. 15/07 /2024 | 18:00 PM |
| 3 | ई- निविदा बीड मीटींग तारीख | दि. 18/07 /2024 | 11:00 AM |
| 4 | ई- निविदाची अंतिम तारीख | दि. 24/07 /2024 | 18:00 PM |
| 5 | ई- निविदेतील तांत्रिक लिफाफा क्र.-1 उघडण्याचा दिनांक | दि. 26/07 /2024 | 11:00 AM |
| 6 | ई- निविदेतील व्यापारी लिफाफा उघडणेचा दिनांक (शक्य असल्यास | दि. / /2024 | |

सदर ई-निविदा जाहिरात सविस्तरपणे **http://www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर दिनांक10 /7 /2024 रोजी पासून प्रसिध्द करणेत येत आहे.

1.उपरोक्त कामाची निविदा संगणकावर ई-निविदा प्रक्रियेव्दारे ऑनलीईन करणेत येईल.याबाबत भविष्य काळातील सर्व सुचना तसेच शुध्दीपत्रके याकामी ऑनलाईन करणेत येईल.

2. उपरोक्त कामाबाबतची संपूर्ण माहिती वरील प्रमाणे संकेतस्थळावर उपलब्ध असून ती वर दिलेल्या कालावधीमध्ये डाउनलोड करुन घेता येईल.

3.कोणतीही निविदा अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार राखुन ठेवणेत येत आला आहे.

(संदिप यादव)
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (मबाक)**
**जिल्हा परिषद सांगली**

तृप्ती धोडमिसे, (भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद सांगली**

Scanned with OKEN Scanner

# महिला व बालकल्याण विभाग जिल्हा परिषद सांगली

सन 2024-25 या वित्तीय वर्षात (सन 2023-24 मधील मंजूर निधीतून) अनुसूचित जाती (विघयो) अंतर्गत सांगली जिल्ह्यातील ग्रामीण भागातील अंगणवाडी केंद्रामधील कुपोषित मुलामुलींसाठी तसेच गरोदर महिला व स्तनदा मातांसाठी अतिरिक्त आहार (मल्टी मिलेट पौष्टीक बिस्कीट) पुरविणे

**निविदा भरणेबाबत मार्गदर्शक सुचना**

१. वरील कामाची निविदा प्रक्रिया संकेतस्थळावर ई निविदा ऑनलाईन करणेत येईल या निविदे संबधी यापुढील सर्व सुचना / शुद्धीपत्रक www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे. तसेच निविदा बाबतची सर्व कार्यपद्धती शासन निर्णय दिनांक १ डिसेंबर २०१६ अन्वये राहील.

२. पूर्ण माहिती भरलेले तांत्रिक लिफाफा क्र. १ ऑनलाईन पद्धतीने www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर महिला व बालविकास विभाग . जि.प. सांगली येथे उघडल्या जातील.

३. निविदा फी बयाना रक्कम इ. संकेतस्थळावरील सुचनेनुसार ऑनलाईन पद्धतीने भरणा करण्यात यावा.

४. सदर निविदेच्या अटी व शर्तीमध्ये नमूद केलेल्या कागदपत्रांच्या व रक्कम भरल्याची पावती स्कॅन केलेल्या प्रती तांत्रिक लिफाफा क्र. १ मध्ये pdf format मध्ये upload करणे आवश्यक आहे. तसेच ईतर आवश्यक माहिती (other Imp document) User A/C चे mydpace/Account मधून सादर करावेत.

५. निविदाधारकाचे नमुना साहित्य तपासणीसाठी नमुना साहित्य लॅब तपासणी फी रक्कम २०,०००/- रू. रकमेचा धनाकर्ष (डी.डी.) मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी(मबावि) जिल्हा परिषद, सांगली या नावाने जिल्हा कार्यालयात सादर करण्यात यावे. आवशक्यतेनुसार निविदेसह सादर केलेले नमुने प्रयोगशाळा तपासणीसाठी पाठविण्यात येतील.

६. सदर कागदपत्रे व रक्कम भरल्याची पावती बाबत पूर्तता न झाल्यास निविदा अवैध ठरवली जाईल.

७. निविदाधारकायने ऑनलाईन निविदा सादर केल्यावर प्रत्यक्षात लिफाफा क्र. १ मध्ये स्कॅन केलेल्या प्रती कार्यालयास सादर करण्याची आवष्यकता नाही. तथापि तांत्रिक छाननी साठी आवष्यकता भासल्यास कार्यालय निविदाधारकांना मूळ प्रती सादर करण्याबाबत सुचित करेल. तसेच सदरच्या प्रती ह्या कार्यालयास सादर करण्यामध्ये ईतर निविदाधारकांच्या बाबतीत अडथळा निर्माण केल्यास अशा निविदाकारांचे नाव जि.प. च्या काळ्या यादीत समाविष्ट करण्यात येईल. तसेच संबाधिताचे ई-निविदा प्रक्रियेतील ऑनलाईन खाते बंद (block) करणे बाबत संबंधित नोडल अधिकारी (ई-निविदा) यांना कळविण्यात येईल.

८. पात्र निविदाधारकाचे वित्तीय लिफाफा क्र. २ उघडणेची वेळ व दिनांक पात्र निविदाधारकाचे email/sms द्वारे संकेतस्थळामार्फत कळविण्यात येईल. तसेच उघडणे पासून पुरवठा आदेश देणेपर्यंतचे सर्व प्रक्रिया संकेतस्थळावर होणार असल्याने याबाबत निविदाधारक आपल्या user a/c मधून अद्यावत माहिती पाहू शकतात. यासाठी कार्यालयाशी अनावश्यक संपर्क करू नये.

९. कोणतीही निविदा अथवा सर्व निविदा त्यातील कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार निविदा/खरेदी समितीने राखून ठेवलेला आहे.

१०. तांत्रिक छाननी , वित्तीय छाननी मध्ये बाद झालेल्या निविदा धारकाची बयाना रक्कम ऑनलाईन पद्धतीने संकेतस्थळाद्वारे परत होईल. सदर बयाना रक्कम विहित वेळेत परत न मिळाल्यास संकेतस्थळावरील सपोर्ट टीमशी संपर्क साधावा.

११. उदयोग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-१ दिनांक ०१/१२/२०१६ नुसार पुरवठा रकमेच्या ३ टक्के अनामत रक्कम म्हणुन पुरवठादाराकडून भरून घेण्यात येईल. सदर रक्कम पुरवठा तसेच लेखा परीक्षण पूर्ण झाल्यावर पुरवठा साहित्य बाबत आक्षेप न निघाल्यास सदर रक्कम पुरवठादारास अदा करण्यात येईल.

<u>लिफाफा क्र.१ तांत्रिक लिफाफा :- या लिफाफयात खालील प्रमाणे अ,ब व क अंतर्गत कागदपत्रे आवश्यक आहेत.</u>
<u>लिफाफा क्र.2 दराचा लिफाफा :-</u> 200 ग्रॅम बिस्किटाचे पाकिट याप्रमाणे फक्त् एका नगाचे सर्व करांसहित व पोहोच करणेसह दर नमूद करावेत.

**अ) निविदा फॉर्म फी:-** निविदाधारकाने निविदा फॉर्म फी रक्कम रू.11,000/- &(रुपये ~~दहा~~ अकरा हजार फक्त) Online e-payment पद्धतीने जमा करणे बंधनकारक आहे. तसेच त्या बाबतची प्रत ई-निविदेत जोडणे आवश्यक राहील.

**ब) बयाना रक्कम:-** निविदाधारकाने बयाना रक्कम ग्रामीण भागातील अंगणवाडी केंद्रामधील कुपोषित मुलामुलींसाठी तसेच गरोदर महिला व स्तनदा मातांसाठी अतिरिक्त आहार (मल्टी मिलेट पौष्टीक बिस्कीट) पुरविणे निविदेसाठी रक्कम **रू.1,00,000/-** (अक्षरी **रुपये एक लाख फक्त**) Online e-payment पद्धतीने जमा करणे बंधनकारक आहे. बयाना रक्कम भरणेपासून सूक्ष्म व लघु मध्यम उदयोग विकास अधिनियम २००६ अंतर्गत उत्पादक म्हणुन नोंदणीकृत असलेल्या सूक्ष्म व लघु मध्यम उद्योगांना मध्यवर्ती भांडार संघटना यांच्याकडे नोंदणी झालेल्या उत्पादक, पुरवठादारांना निविदा शुल्क व बयाना शुल्क भरण्यापासून सुट देणेत आलेली आहे. या बाबत आवश्यक ती कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

**क) ई-निविदा तांत्रिक लिफाफा क्र. १ मध्ये जोडावयाची कागदपत्रे**

1. निविदाधारक जर उत्पादक असेल तर त्याचे उत्पादक असल्याबाबतचे नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
2. निविदाधारकाने उत्पादक असलेबाबतची सक्षम प्राधिका-याचे नोंदणी प्रमाणपत्र निविदे सोबत जोडणे आवश्यक आहे. उत्पादक कंपनीचे व्यापारचिन्ह (brand name) नोंदणीकृत असल्यास तसे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
3. जर निविदाधारक अधिकृत विक्रेता/ पुरवठादार असल्यास तसे उत्पादकाचे अधिकृत विक्रेता असल्याचे प्रमाणपत्र निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच उत्पादकांचे FSSAI प्रमाणपत्र जोडण्यात यावे .
4. उत्पादकाने व वितरकाने अन्न व औषध प्रशासन विभागाचे (FDA) यांचे कडील उत्पादक व विक्री परवाना प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
5. उत्पादकाने / वितरकाने भारतीय खादय सुरक्षा व मानक प्राधिकरण (FSSAI) यांचेकडील उत्पादन व विक्री परवाना प्रमाणपत्र जोडावे.
6. मल्टी मिलेट पौष्टीक बिस्कीट चा टेस्ट रिपोर्ट (B-1,B-2/G-1, G-2) NABL Scope मध्ये असणाऱ्या Food Testing Laboratory कडील तपासणी अहवाल प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
7. निविदाधारक जर अधिकृत / पुरवठादार असेल तर शॉप ऍक्ट नुसार नोंदणी प्रमाणपत्र अथवा सक्षम प्राधिका-यांचे नोंदणी प्रमाणपत्र निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे.
8. निविदाधारकांचे GST नोंदणी प्रमाणपत्र प्रत जोडणे आवश्यक आहे.
9. निविदाधारकाचे Permanent Account Number (PAN) ची प्रत जोडणे आवश्यक आहे.
10. निविदाधारकाने मागील तीन वित्तीय वर्षाचे आयकर भरल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. (Assessment year 2020-21, 2021-22, 2022-2023)

Scanned with OKEN Scanner

११. निविदाधारकाने मागील तीन वर्षाचे सन 2020-21, 2021-2022, 2022-2023 या तीन वित्तीय वर्षात सरासरी सनदी लेखापाल यांचे रक्कम रु. २०.०० लाखापर्यन्तचे Turnover प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.तसेच सदर तीनही वर्षाची ऑडीटेड आर्थीक पत्रके जोडावीत.
12. निविदाधारकांचे दिनांक ३१/०३/२०२३ अखेर GST व Professional Tax भरणा केल्याची पावती सादर करावी.
13. निविदेत दर्शविलेल्या १ ते २९ सूक्ष्म पोषक तत्वे असलेली (**मल्टी मिलेट पौष्टिक बिस्किट**) या आहाराचा जिल्हा परिषद स्तरावर मागील तीन वर्षाचा पुरवठा केल्याचा अनुभव असणे आवश्यक आहे. त्याबाबतच्या पुरवठा आदेशाच्या प्रती जोडण्यात यावे. विभागास आवश्यक वाटल्यास पुरवठा आदेशाची सत्यता पडताळण्यात येईल. सदर साहित्याचा एकाच वेळी कमीत कमी 20 टक्के रक्कमेचा पुरवठा केल्याचा अनुभव असावा व तसेच कागदपत्रे ई-निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे.
14. निविदाधारकांने उत्पादक संस्थेचे ISO 9001: 2015 ISO 22000:2018 च्या नोंदणीचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
15. निविदेमधील सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबत रु. ५००/- चे स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र जोडणे आवश्यक राहील.
16. निविदा वेळापत्रकाप्रमाणे दिनांक व वेळेत (कार्यालयीन सुट्टीचे दिवस सोडून) निविदेतील साहित्याच्या विवरणात नमूद स्पेसिफिकेशन प्रमाणे(**मल्टी मिलेट पौष्टीक बिस्कीट**) नमुना तपासणी करण्यात आलेली प्रयोगशाळा हि NABL प्रमाणित FOOD TESTING LAB असल्याचे प्रमाणपत्र (CERTIFICATION) प्रत ई-निविदेतील कागदपत्रांसोबत Upload करणे अनिवार्य आहे. तसेच नमुना, तपासणी अहवाल व नमुना तपासणी शुल्क धनाकर्ष (डी.डी.) कार्यालयात सादर केल्याची प्रत ई-निविदा कागदपत्रांमध्ये जोडणे बंधनकारक आहे.तसेच सदर साहित्याचा एक नमूना टेंडर प्रसिध्दी पासून टेंडर भरण्याच्या अंतिम दिनांकाअखेर कार्यालयीन वेळेत (कार्यालयीन सुटटी वगळून) या कार्यालयात जमा करणे बंधनकारक राहील.सदर साहित्याचा दर्जा व गुणवत्ता खरेदी समितीबाबत पडताळून घेणेत येईल.
17. निविदाधारकांचे विभांगास प्राप्त् झालेले (मल्टी मिलेट पौष्टीक बिस्कीट) चे नमुने तपासणीसाठी **NABL** मान्यता प्राप्त LAB मध्ये पाठविण्याचे सर्व अधिकार जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबावि), जिल्हा परिषद सांगली यांना राहील.
18. उदयोग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय दिनांक १ डिसेंबर २०१६ मधील मार्गदर्शक सूचना (५.७.२) नुसार खरेदी तक्रार निवारण करण्याची कार्यपद्धतीचा अवलंब केला जाईल.
19. उत्पादकाचे / वितरकाचे FSSAI (भारतीय खादय सुरक्षा व मानक प्राधिकरण) तसेच अन्न व्यवस्थापन प्रणाली जागतिक प्रमाणन प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
20. उत्पादकाचे पर्यावरण व्यवस्थापन प्रणाली प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
21. उत्पादकाचे उत्पादन शाकाहारी असल्याचे अनुपालण प्रमाणपत्र जोडणे आवश्यक असून उत्पादन शाकाहारी दर्शविणारे चिन्ह प्रत्येक पाकिटावर त्या बाबत नमूद करणे बंधनकारक राहील.
22. उत्पादक/वितरकाचे सूक्ष्म व लघु मध्यम उद्योग मंत्रालयाचे ZED प्लेज प्रमाणपत्र तसेच GMP व HACCP प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे आणि ते निविदेसोबत जोडणे बंधनकारक आहे.
23. ई-निविदाधारक कोणत्याही प्राधिकरणाकडुन Black listed नसल्याबाबतचे रु.५००/- चे स्टॅम्प पेपरवर नोटरी करुन प्रतिज्ञापत्र जोडणेत यावे.सदर प्रतिज्ञापत्रामध्ये सदर निवेदे सोबत सादर केलेली (Upload) केलेली सर्व कागदपत्रे सत्य् आहेत असे नमूद करणे बंधनकारक आहे.त्यानंतर कागदपत्रांबाबत काही तफावत आढळलेस कार्यालयाचा निर्णय अंतिम राहील.
24. संस्था असल्यास संस्थेबाबत नोंदणीचा दाखला असणे आवश्यक आहे तसेच सहकारी संस्थेबाबत उपविधीची प्रत, भागीदार संस्था असल्यास पार्टनरशिप डिड ची प्रत जोडावी.
25. केंद्र व राज्य किंवा जिल्हा परिषद सेवेशी संलग्न किंवा अप्रत्यक्ष संबधीत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.
26. सर्व कागदपत्रे सांक्षाकित असणे आवश्यक आहे.

| | | |
|---|---|---|
| **उपमुख्य् कार्यकारी अधिकारी (मबाक)**<br>**जिल्हा परिषद सांगली** | **मुख्य लेखा वित्त अधिकारी**<br>**जिल्हा परिषद सांगली** | **मुख्य कार्यकारी अधिकारी**<br>**जिल्हा परिषद सांगली** |

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

# महिला व बालकल्याण विभाग जिल्हा परिषद सांगली

सन 2024-25 या वित्तीय वर्षात **(सन 2023-24 मधील मंजूर निधीतून)** अनुसूचित जाती (विघयो) अंतर्गत सांगली जिल्ह्यातील ग्रामीण भागातील अंगणवाडी केंद्रामधील कुपोषित मुलामुलींसाठी तसेच गरोदर महिला व स्तनदा मातांसाठी अतिरिक्त आहार (मल्टी मिलेट पौष्टीक बिस्कीट) पुरविणे

**ड) निविदेच्या अटी व शर्ती:-**

1. सशर्त निविदा विचारात घेतली जाणार नाही.
2. अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचा अथवा नवीन अट समाविष्ट करण्याचा अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी . जिल्हा परिषद सांगली यांनी राखून ठेवला आहे.
3. साहीत्यांचे पुरवठा निविदेतील वर्णनानुसार करावा लागेल बाविप्रअ यांचे कार्यालयावर साहित्य / माल पुरवठा सुस्थितीत करावा तुट-फुट खराब साहीत्य / माल स्वीकारल्या जाणार नाहीत.
4. निविदेतील पात्र पुरवठाधारकाने पुरवठा आदेश दिल्यानंतर साहित्य / मालाचा पुरवठा न केल्यास किंवा पुरवठा आदेश घेण्यास नकार दिल्यास त्याची सुरक्षा ठेव जप्त करुन त्याचे नाव काळया यादीत समाविष्ठ करण्याबाबत कार्यवाही केली जाईल.
5. पुरवठा कालावधीत भाववाढ झाल्यास ई- निविदेतील दरा व्यतिरिक्त कोणतीही रक्कम देय असणार नाही.
6. उदयोग उर्जा व कामगार विभागांचे शासन निर्णय दिनांक ०१/१२/२०१६ मधिल तरतुदी नुसार विहीत मुदतीत पुरवठा करणे बंधनकारक राहील.
7. उदयोग. उर्जा व कामगार विभागांचे शासन निर्णय दिनांक ०१/१२/२०१६ मधिल परिशिष्ठ - अंतर्गत 1.Risk purchase 2. Fall clause 3. Force Majeure अटी बंधनकारक राहतील.
8. आवश्यक वाटल्यास निविदाधारका च्या उत्पादक केंद्राची तपासणी व मुल्यांकन करण्यात येईल. त्यात पात्र ठरलेल्या पुरवठाधारकांचेच व्यापारी लिफाफे उघडण्यात येईल.
9. **मल्टी मिलेट पौष्टिक बिस्किट** चा पुरवठा करण्यात येणाऱ्या पाकिटावर साहित्याचे प्रमुख अन्नघटक व त्यातील पोषक तत्वे त्याबाबतचे सविस्तर विवरण तसेच महिला व बालविकास विभाग अशी प्रिंट चिकटवणे आवश्यक आहे. तसेच प्रत्येक पाकिटावर Not For Sale , Gov. Supply. Only आणि Manufacturing Date, Expiry Date, Composition ई. नमूद करणे बंधनकारक राहील.
10. **मल्टी मिलेट पौष्टिक बिस्किट** हे खाण्या योग्य कालावधी प्रत्यक्ष पुरवठा केल्यानंतर किमान तीन महिने असणे आवश्यक राहील. **(मल्टी मिलेट पौष्टिक बिस्किट)** २०० ग्रॅम पॅकिंगमध्ये पुरवठा करावयाचा आहे तसेच सदरचे पॅकिंग मटेरियल हे Poly Bag Food Grade Standard हे शासन मान्य तपासणी संस्था (NABL) कडून प्रमाणित करणे आवश्यक असून सदरचा पुरवठा हवाबंद (Air Tight) स्वरुपात करणे बंधनकारक राहील.
11. निविदाधारकाने साहित्य प्रमाणानुसार हे सांगली जिल्ह्यातील सर्व एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प कार्यालयात पोहोच करणे बंधनकारक राहील.
12. निविदाधारकाने नमुद दरामध्ये दिनांक 1 जुलै 2017 पासून लागु झालेल्या वस्तु व सेवा कर कायदा (जीएसटी) इतर प्रचलित कर, शुल्क आणि वाहतूक खर्च या सर्व करासहित वस्तुंची किंमत एकत्रित नमुद करावेत सर्व परिमाण वा दर पुर्ण रुपयात दयावेत.
13. निविदाधारकांने सादर केलेले दर हे शासन निर्णयानुसार निविदा स्विकृतीच्या दिनांकापासून ६ महिन्यापर्यंत बंधनकारक राहतील.
14. निविदा प्रपत्रामध्ये दर नमुद करताना एकच दर नमुद करणेत यावा. एकाच साहित्याकरीता त्याचा प्रकार दर्शवून वेगवेगळे दर नमुद करु नयेत.
15. निविदा खरेदीची रक्कम अंदाजित आहे. यामध्ये एखान्द्या योजनेच्या तरतुदीत वाढ अथवा घट झालेनुसार खरेदी कमी-अधिक रक्कमेची करणेत येईल आणि या बाबतचे सर्वाधिकार खरेदी अधिकारी यांना राहतील.
16. नामंजूर ई- निविदाबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.
17. निविदेतील साहीत्यांचे प्रसिध्द करणेत आलेले विनिर्देशानुसार शासन दरकरार अस्तित्वात आल्यास किंवा शासनाने खरेदी धोरणात काही बदल केलेस किंवा मुख्य कार्यकारी आधिकारी यांनी निविदा प्रक्रिया कोणत्याही टप्यावर रदद करणेचे ठरविल्यास असे आधिकार राखुन ठेवण्यात आलेले आहेत.
18. उदयोग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-१ दिनांक ०१/१२/२०१६ नुसार पुरवठा रकमेच्या ३ टक्के अनामत रक्कम म्हणुन पुरवठादाराकडून भरून घेण्यात येईल. सदर रक्कम पुरवठा तसेच लेखा परीक्षण पूर्ण झाल्यावर पुरवठा साहित्य बाबत आक्षेप न निघाल्यास सदर रक्कम पुरवठादारास अदा करण्यात येईल.
19. ज्या निविदाधारकाची निविदा स्वीकृत केली जाईल त्या निविदाधारकाने एकूण पुरवठा करावयाच्या रक्कमेच्या ३ टक्के सरासरी अनामत रक्कम देयकातून कपात केली जाईल तसेच लेखा परीक्षण अहवालाच्या अधीन राहून लेखापरीक्षण पूर्ण झाल्यावर सदर रक्कम पुरवठादारास अदा करण्यात येईल.
20. पुरवठा आदेश देण्यापूर्वी शासन नियमानुसार ३५००/- रक्कम रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करून देणे बंधनकारक राहील.
21. देयकाचे प्रदान पुरवठा आदेशातील विनिर्देशानुसार साहित्य प्रकल्प स्तरावर पुरवठा आदेशातील नमूद ठिकाणापर्यंत पुरवठा सुस्थितीत केल्याच्या पोहोच पावत्या दोन प्रतीत या कार्यालयात सादर करण्यात यावे.
22. साहित्य पुरवठा सुस्थितीत झालेल्या बाबतच्या पोहोच पावत्या व देयक कार्यालयात सादर केल्यानंतरच देयकाची रक्कम अदा करण्यात येईल.
23. निविदेतील अटी व शर्ती याबाबत कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण झाल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांचा निर्णय अंतिम राहील. त्याबाबतचे न्यायलयीन कार्यक्षेत्र सांगली राहिल यांची नोंद सर्व निविदाधारकांनी घ्यावी.

| | | |
|---|---|---|
| **उपमुख्य कार्यकारी अधिकारी (मबाक)**<br>**जिल्हा परिषद सांगली** | **मुख्य लेखा वित्त अधिकारी**<br>**जिल्हा परिषद सांगली** | **मुख्य कार्यकारी अधिकारी**<br>**जिल्हा परिषद सांगली** |

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

Schedule A

**मल्टी मिलेट पौष्टिक बिस्किट पदार्थ घटक (स्पेसिफिकेशन)**

| अ.क्र | सुक्ष्म पोषक तत्वे | जीवनसत्वे क्षार व सुक्ष्म पोषक तत्वाचे उणीव भरुन काढणेसाठी पुरविण्यात येणा-या आहारात किमान आवश्यक असलेली जिवनसत्वे क्षार व सुक्ष्म पोषक तत्वाचे प्रमाण | |
|---|---|---|---|
| | | **प्रमाण** | **युनिट** |
| 1 | उष्मांक (kcal) | 415 | Kcel/100gm |
| 2 | प्रथिने(g) | 9.70 | % |
| 3 | लोह (mg) | 0.45 | Mg/100 gm |
| 4 | कॅलशियम (mg) | 25 | Mg/100 gm |
| 5 | थायमीन (mg) | 0.30 | Mg/100 gm |
| 6 | रायबोपलीना (mg) | 8 | Mg/100 gm |
| 7 | नायसिन (mg) | 0.40 | Mg/100 gm |
| 8 | विटामीन - सी (mg) | 220 | Mg/100 gm |
| 9 | फोलीक ॲसिड (mg) | < 0.05 | Mg/100 gm |
| 10 | फायबर | 2.50 | % |
| 11 | कार्बोहायड्रेस | 72 | % |
| 12 | कॅरोटीन(A) | 115 | Mg/100 gm |
| 13 | विटामीन (D) | <0.05 | Mg/100 gm |
| 14 | विटामीन (E) | <0. 2 | Mg/100 gm |
| 15 | विटामीन (K) | <0.05 | Mg/100 gm |
| 16 | विटामीन (B-6) | 17 | Mg/100 gm |
| 17 | विटामीन (B-12) | 4.50 | Mg/100 gm |
| 18 | पॅटॉथेनिक ॲसिड (B-5) | 48 | Mg/100 gm |
| 19 | बायोटीन (B-7) | 175 | Mg/100 gm |
| 20 | पोटॅशियम | 880 | Mg/100 gm |
| 21 | फॉस्फरस | 90 | Mg/100 gm |
| 22 | सोडीयम | 30 | Mg/100 gm |
| 23 | मॅग्नेशियम | 25 | Mg/100 gm |
| 24 | झिंक | <0.5 | Mg/100 gm |
| 25 | कॉपर | 0.15 | Mg/100 gm |
| 26 | आयोडीन | <0.1 | Mg/100 gm |
| 27 | सॅलेनिअम | <0.05 | Mg/100 gm |
| 28 | N-6 फॅटी ॲसिडस | 2 | % |
| 29 | N-6 फॅटी ॲसिडस | 0.050 | % |

Deputy Chief Executive Officer(C.W.)
Zilla Parishad, Sangli.

Scanned with OKEN Scanner

Schedule B

Manufacturer`s Authorization form

No-------------------- Date---------------

To,

-----------------------------------

-----------------------------------

-----------------------------------

Bid Reference : ---------------------------------------------

Dear Sir,

We ------------------------------------------------who are establishes & reputable manufacturers of ------------------------------------------------ (Name, description of good offered) having factories at ------------------------------------- (address of factory) do hereby authorize M/s -----------------------------------------------------(Name & address of agent) to submit a bid & sign the contract with you for the goods manufactured by us against the Bid referred above.

We hereby extend our full guarantee & warranty for the good & services offered for supply by the above firm against this bid.

Date -

Yours faithfully

(Name of Manufacturer)

Scanned with OKEN Scanner

## Schedule C

### Performa for performance statement

**Name of the firm -**

| Orders places by (Full address of purchaser) | Order No & Date | Description & Quantity of goods ordered | Value of order | Date of completion of delivery as per contract/Actual | Remarks indicating reasons for late delivery if any |
|---|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

**Signature & seal of the Bidder------------**

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner